आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विकासदर वाढवण्यासाठी देशातल्या संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- हुंडा आणि कौटुंबिक हिंसाचारांशी संबंधित कायद्यांचा गैरवापर थांबवण्यासाठीच्या जनहित याचिकेच्या सुनावणीला सर्वोच्च न्यायालयाचा नकार
- महिलांच्या १९ वर्षाखालील टी - ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा स्कॉटलंडवर दीडशे धावांनी विजय

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा सामना आज रात्री राजकोटमध्ये

**<><><><><><>**

केवळ कच्च्या मालाची निर्यात करून विकासाचा वेग वाढणं शक्य नसून विकासदर वाढवण्यासाठी संपूर्ण औद्योगिक परिसंस्थेत सुधारणा करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. भुवनेश्वर इथे उत्कर्ष ओदिशा- मेक इन ओदिशा कॉनक्लेव्हच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संशोधन आणि नवोन्मेषासाठी एक सशक्त परिसंस्था निर्माण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला आणि उद्योगांना या प्रयत्नात सरकारसोबत सहकार्य करण्याचं आवाहनही केलं.

**होल्ड बाईट… प्रधानमंत्री**

उत्कर्ष ओदिशा ही ओदिशा सरकारतर्फे आयोजित केलेली एक प्रमुख जागतिक गुंतवणूक शिखर परिषद असून त्याचा उद्देश ओदिशाला भारतातलं एक आघाडीचं गुंतवणूक केंद्र आणि औद्योगिक केंद्र बनवणं असा आहे. दोन दिवसांच्या या परिषदेद्वारे पाच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक व्हावी, असं ओदिशा सरकारचं उद्दिष्ट असून यामुळे साडे तीन लाख रोजगारांची निर्मिती होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

अभय हा प्रकल्प देशभरातले ट्रक चालकांचे जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने सुरू झालेला उपक्रम आहे. ट्रकचालकांना वाहतूक करताना येणारी आव्हानं, त्यांचं शारीरिक तसंच मानसिक आरोग्य यांना प्राधान्य देणारी परिसंस्था तयार करणं हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यात व्यापक स्तरावर आरोग्य तपासणी, डोळ्यांची तपासणी आणि चश्मा वाटप करणं, समुपदेशन आणि ताण व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन, वाहतूक नियमांविषयी आणि सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती देणं अशा विविध माध्यमातून ट्रक चालकांचं जीवनमान सुधारण्यावर भर दिला जातो. या प्रकल्पामुळे गेल्या वर्षभरात सहा राज्यं आणि १५ शहरांमधल्या ५० हजार ट्रकचालकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला आहे.

या प्रकल्पाच्या पथदर्शी टप्प्याच्या यशस्वी पूर्ततेबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी कौतुक केलं. नवी दिल्लीत इथे ग्रामीण विकास आणि तंत्रज्ञान केंद्राच्या अभय प्रकल्पाच्या समारोप कार्यक्रमाला ते संबोधित करत होते.

**<><><><><>**

मुंबईतल्या अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवर पथकर आणखी एक वर्षासाठी २५० रुपये इतकाच कायम ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला.

**<><><><><>**

कॅप्टीव्ह मार्केट योजने अंतर्गत 'एक रेशन कार्ड एक साडी' या योजनेची
सुरुवात वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते भुसावळमध्ये करण्यात आली. या योजनेअंतर्गत राज्यातल्या २४ लाख ८७ हजार ३७५ अंत्योदय शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानातून साडी वितरण होणार आहे. सहकारी यंत्रमाग संस्था आणि सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग अंतर्गत नोंदणीकृत घटकाकडून साड्यांचे उत्पादन करण्यात आलं असून त्यामुळे विणकरांना रोजगार उपलब्ध झाल्याचं, संजय सावकारे यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><><>

**अहिल्यानगर** शहरात सांस्कृतिक संकुल उभे रहावं, यासाठी संबधित विभागाचे मंत्री, नाट्य परिषदेचे पदाधिकारी आणि संबधित अधिकाऱ्यांबरोबर लवकरच बैठक घेण्यात येईल, तसंच राज्यातल्या विद्यापीठांमध्ये कला आणि नाट्यशास्त्र विभागांना अधिकचा निधी मिळावा यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिली आहे. १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्यसंमेलनाच्या समारोप प्रसंगी काल ते बोलत होते.

<><><><><><>

एसटी भाडेवाढ विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज राज्यात विविध ठिकाणी आंदोलन झालं.

**सिंधुदुर्गमधल्या** कुडाळ बसस्थानकात आज सकाळी चक्काजाम आंदोलन करण्यात आलं. निवडणुकीपूर्वी एसटीची दरवाढ केली नव्हती पण आता निवडणूक झाल्याबरोबर महायुती सरकारने एसटीची दरवाढ केली. ही दरवाढ रद्द झाली नाही, तर यापेक्षा मोठे आंदोलन उभारू, असा इशारा माजी आमदार वैभव नाईक यांनी दिला आहे.

**सोलापुरातल्या** छत्रपती शिवाजी चौकातल्या एस टी स्टॅन्ड इथं आणि **धुळे** बस स्थानकातही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं चक्का जाम आंदोलन करण्यात आलं.

<><><><><><>

हुंडा आणि कौटुंबिक हिंसाचारांशी संबंधित कायद्यांचं पुनरावलोकन करून त्यांचा गैरवापर थांबवण्यासाठी त्यात सुधारणा करण्याची विनंती करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली आहे. यासाठी समाज सुधारायला हवा, यात आम्ही काहीही करू शकत नाही, असं सांगून न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी ही याचिका ऐकायला काल नकार दिला. बेंगळुरूचा रहिवासी असलेल्या आयटी कर्मचाऱ्याच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल केली होती. तसंच, लग्नसमारंभादरम्यान दिलेल्या वस्तू, भेटवस्तू, पैसे यांची यादी सरकारनं करावी, त्याचं

शपथपत्र तयार करावं आणि लग्ननोंदणी प्रमाणपत्रासोबत ते जोडावं, असंही याचिकेत म्हटलं होतं.

<><><><><>

भंडारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी काँग्रेसच्या कविता उके तर उपाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकनाथ फेंडर यांची काल निवड झाली. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जमातीसाठी राखीव होते. त्यासाठी भाजपाच्या माहेश्वरी नेवारे यांच्या नावाची चर्चा होती. मात्र त्यांचं जात वैधता प्रमाणपत्र रद्द झालं. त्यामुळं फेंडर यांची निवड झाली.

<><><><><>

अमरावतीमध्ये मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीत वरूड मार्गावर भाईपुर फाट्याजवळ काल एक भरधाव तवेरा गाडी उलटून अपघात झाला. यात एका महिलेचा मृत्यू झाला असून १२ जण गंभीर जखमी झाले. रस्त्यावर अचानक मोकाट गुरे आल्याने चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटलं आणि हा अपघात झाला.

<><><><><>

नागपुरात ताजाबाद इथं हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह यांची जयंती उत्साहानं साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्टनं मिरवणूकही काढली होती. सोहळ्यात नागपूरसह देशविदेशातले भाविक सहभागी झाले होते. या निमित्ताने ट्रस्टच्या वतीने विविध कार्यक्रमांचं आयोजनही करण्यात आलं होतं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तराखंडच्या देहरादून इथल्या महाराणा प्रताप स्टेडियमवर ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन करणार आहेत. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे पदाधिकारी आणि राष्ट्रीय खेळाडू उपस्थित राहणार आहेत.

उत्तराखंडमधल्या आठ जिल्ह्यातल्या ११ शहरांत १४ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा चालणार आहे. स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन होण्याआधी २६ जानेवारीला उधमसिंगनगरच्या गोलापूर इथं झालेल्या ट्रायथलॉन स्पर्धेत मणिपूर आणि महाराष्ट्रानं पदकं जिंकली आहेत.

<><><><><><>

१९ वर्षांखालील महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर सिक्स गटाच्या अंतिम सामन्यात भारताने स्कॉटलंडवर दीडशे धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. भारताच्या २०९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना स्कॉटलंडचा संघ १४ षटकांत केवळ ५८ धावांवरच गडगडला. स्कॉटलंडची सुरुवात ही चाचपडत झाली. अवघ्या १३ धावांवर पिप्पा केली हिच्या रुपाने स्कॉटलंडला पहिला झटका बसला. त्यानंतर  स्कॉटलंडच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करण्यात यश आलं नाही. भारताच्या आयुषी शुक्लानं चार गडी बाद केले. तर वैष्णवी शर्मा आणि गोंगदी त्रिशा यांनी प्रत्येकी तीन गड्यांना तंबूचा रस्ता दाखवला.

त्याआधी भारताची सलामीवीर गोंगदी त्रिशाने नाबाद ११० धावा केल्या. अवघ्या ५९ चेंडूंमध्ये १३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने तिनं ही कामगिरी केली. तर जी कमलीनी हिने अर्धशतक केलं.

दरम्यान, भारताने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत याआधीच प्रवेश केला आहे. तर ब गटामध्ये दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड यांनी अंतिम चारमधे आपलं स्थान निश्चित केलं आहे.

<><><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा सामना आज राजकोट मधे निरंजन शाह स्टेडियमवर होणार  आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. पाच सामन्यांच्या मालिकेत भारत २-० नं आघाडीवर आहे.

पहिल्या सामन्यात भारताने इंग्लंडचा सात गडी राखून पराभव केला होता. तर दुसऱ्या सामन्यात दोन गडी राखून इंग्लंडवर मात केली होती.

<><><><><><>

वसईच्या कोपर गावात क्रिकेट खेळताना एका २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. हृदयविकाराच्या झटक्यानं मैदानावरच त्याचा मृत्यू झाला. यापूर्वीही त्याला हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर डॉक्टरांनी त्याला क्रिकेट न खेळण्याचा सल्ला दिला होता.

//<><><><><><>//